# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी.जि.-अहमदनगर 413 722

फोननं. :- 02426-243226 ई मेल:- comptroller.mpkv@gov.in


जा.क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/ ४९० /२०१९, दिनांक : २०/०८/२०१९

परिपत्रक

**विषय:- कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथील पूरग्रस्तांसाठी विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन पूरग्रस्त सहाय्यता निधीस जमा करणेबाबत...**

माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथील अतिवृष्टीमुळे आलेल्या महापूराने तेथील जनजीवन पूर्णत: विस्कळीत झालेले आहे. त्यांना आज विविध क्षेत्रामधून सहकार्य होणे अपेक्षित आहे. हा बाधीत परिसर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असून, तेथील नागरिकांचा विद्यापीठाशी घनिष्ट संबंध आहे.

त्यानुषंगाने दि. १५ ऑगस्ट, २०१९ रोजी मध्यवर्ती परिसर येथे ७३व्या स्वातंत्रदिनानिमित्त संबोधन करतांना मा. कुलगुरु महोदय यांनी उपरोक्त क्षेत्रातील पूरग्रस्तांना आर्थिक मदत करण्यासाठी विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन पूरग्रस्तांकरीता सहायता निधीमध्ये देणेबाबत आवाहन केलेले आहे.

त्यानुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी, कर्मचारी यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथील पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत करणेसाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या एक दिवसाचे वेतन देणगी म्हणून जमा करावे.

एक दिवसाचे वेतन कपात करताना ते मूळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे. सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदरची कपात ऑगस्ट, २०१९च्या मासिक वेतन देयकातून करण्यात न चुकता करावी.

कपातीची रक्कम RTGS द्वारे नियंत्रक, मफुकृवि, राहुरी यांचे नावे Axis Bank A/C No. 917020062493322, IFSC code UTIB0000742 या खात्यावर वर्ग करावी व कर्मचाऱ्यांच्या यादीसह (नाव, पदनाम, एकुण मासिक वेतन व कपातीची रक्कम अशा रकान्यांमध्ये) तसा अहवाल या कार्यालयास email द्वारे सादर करावा.

नियंत्रक
म.फु.कृ.वि., राहुरी

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित..

१. मा. संचालक, कृषि शिक्षण/ संशोधन व विस्तार शिक्षण/ मफुकृवि, राहुरी.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना पुनश्च सुचना द्याव्यात व पाठपुरावा करावा.

२. सहयोगी अधिष्ठाता (सर्व), विभाग प्रमुख (सर्व)

३. सहयोगी संशोधन संचालक (सर्व).

४. कुलसचिव / विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

५. विद्यापीठ ग्रंथपाल/ सुरक्षा अधिकारी/ विद्यार्थी कल्याण अधिकारी/विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी
६. प्राचार्य, सर्व कृषि तंत्र विद्यालये.
७. उप-कुलसचिव (प्रशासन/विद्या), सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व)
८. शाखा प्रमुख/प्रभारी अधिकारी/योजना प्रमुख (सर्व)
९. अधिदान व लेखा अधिकारी पुणे/धुळे/कोल्हापूर/राहुरी/अ.अलेअ,म.फु.कृ.वि, राहुरी
१०. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालये (सर्व), कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव
११. मा. कुलगुरु/कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी

Scanned by CamScanner